**सन १९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम २२ चे कलम ३३ (१)(प) अन्वयेचा मनाई आदेश.**

१) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र, यांचेकडील क्रमांक–रानिआ/मनपा–२०१७/प्र.क्र.२/का.५, दिनांक ११/०१/२०१७ अन्वये.

२) जा.क्र.विशा/मनपा/निवडणुक/मनाई आदेश/ ०३ /२०१७, दिनांक २३/०१/२०१७

**आदेशः–**

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ मधील अधिसूचनेनुसार राज्य निवडणूक आयोगाने, **ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक–२०१७** चा कार्यक्रम जाहीर केला आहे. आदर्श आचारसंहिता दिनांक ११/०१/२०१७ रोजी मध्यरात्री १२.०० पासून लागू झाली असून दिनांक २७/०१/२०१७ पासून ते दिनांक ०३/०२/२०१७ चे दरम्यान नामनिर्देशन पत्र दाखल करणे व दिनांक ०४/०२/२०१७ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होवुन दि.०७/०२/२०१७ रोजी उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख असून दिनांक ०८/०२/२०१७ रोजी निवडणूक चिन्ह नेमून अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व दिनांक ०८/०२/२०१७ रोजीच मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे, महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. तसेच मतदान दिनांक २१/०२/२०१७ रोजी होणार असुन दिनांक २३/०२/२०१७ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करावयाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष प्रचारासाठी झेंडे उभारणे, बॅनर्स, कापडी फलक, पोस्टर लावणे, नोटीसा चिटकविणे, घोषणा लिहीणे, कमान, पताका, कट आउट लावणे किंवा चिन्हे वापरतात, त्यामुळे अनेक वेळा दोऱ्या, काठया व तत्सम भाग रस्त्यावर आडवा येऊन रहदारीस अडथळा होतो. ज्याअर्थी प्रचाराचे कालावधीत अशा किरकोळ कारणावरून वाद निर्माण होऊन पक्ष कार्यकर्त्यामध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन सार्वजनिक शांततेचा भंग होऊ शकतो.

त्या अर्थी **ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उप आयुक्त परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ– ५ वागळे इस्टेट तसेच परिमंडळ–४ उल्हासनगर हद्दीतील निवडणूक प्रभाग क्षेत्रात** निवडणुकीच्या अनुषंगाने जनजीवन सुरळीत राहण्यासाठी, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था जोपासण्यासाठी तसेच कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सामाजिक तेढ निर्माण होवू नये म्हणुन **मी 'परम बीर सिंह', पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** सन १९५१ चा कायदा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून **ठाणे पोलीस आयुक्तालयातील ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात/प्रभागात** महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१)(प) अन्वये रहदारीस अडथळा होईल किंवा उजेड व हवा निर्वेधपणे येण्यास प्रतिबंध होईल अशा रितीने कोणत्याही सार्वजनिक रस्ता व सार्वजनिक जागेवर बॅनर्स लावणे, फलक लावणे, खांबावर झेंडे लावणे यांस या **ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उप आयुक्त परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ– ५ वागळे इस्टेट तसेच परिमंडळ–४ उल्हासनगर हद्दीतील निवडणूक प्रभाग क्षेत्रात निवडणुक प्रक्रीया संपेपर्यंतच्या कालावधीसाठी मी प्रतिबंध करीत आहे.**

सदर महानगरपालिका निवडणूकीचे काळात कोणत्याही राजकीय पक्षाच्या कोणत्याही उमेदवाराने खाजगी इमारत अथवा आवारात पोष्टर, झेंडे, बॅनर्स, कापडी फलक लावणे नोटीसा चिटकविणे, घोषणा लिहिणे इत्यादीचा वापर करावयाचा असल्यास त्यांनी प्रथम जागा मालकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. अशी लेखी परवानगी संबंधित पोलीस स्टेशनला दाखवून पोलीसांचा ना हरकत दाखला घेणेदेखील बंधनकारक राहील अशा रितीने खाजगी जागेवर लावलेले बॅनर्स, पोष्टर्स इत्यादीमुळे रहदारीस अडथळा होणार नाही व उजेड हवा अडवली जाणार नाही हे पहाणे त्या पक्षाच्या उमेदवाराला बंधनकारक राहील.

मी सुचना देतो की, सदरहू आदेशाच्या प्रती **ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका निवडणुक प्रभागातील निवडणूक क्षेत्रात** सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी चिटकवून ध्वनीक्षेपकाव्दारे सदर आदेश प्रसारीत करावा व तशा नोंदी घेण्यात याव्यात.

**सदर मनाई आदेश दिनांक २४/०१/२०१७ रोजी ००.०१ वा पासून ते दिनांक २३/०२/२०१७ रोजी २४.०० वा पावेतो लागू राहील. सदर मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.**

**सदर आदेश आज दिनांक २३/०१/२०१७ रोजी माझे सही शिक्क्यानिशी जारी केलेला आहे.**

दिनांक :– २३/०१/२०१७

शिक्का

( परम बीर सिंह )

**पोलीस आयुक्त, ठाणे शहर**

# फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४

१) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र, यांचेकडील क्रमांक–रानिआ/मनपा–२०१७/प्र.क्र.२/का.५ दिनांक ११/०१/२०१७ अन्वये.

२) जा.क्र.विशा/मनपा/निवडणुक/मनाई आदेश/ ०४ /२०१७, दिनांक २३/०१/२०१७

**आदेशः–**

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ मधील अधिसूचनेनुसार राज्य निवडणूक आयोगाने, **ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक–२०१७** चा कार्यक्रम जाहीर केला आहे. आदर्श आचारसंहिता दिंनाक ११/०१/२०१७ रोजी मध्यरात्री १२.०० पासून लागू झाली असून दिनांक २७/०१/२०१७ पासून ते दिनांक ०३/०२/२०१७ चे दरम्यान नामनिर्देशन पत्र दाखल करणे व दिनांक ०४/०२/२०१७ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होवुन दि.०७/०२/२०१७ रोजी उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख असून दिनांक ०८/०२/२०१७ रोजी निवडणूक चिन्ह नेमून अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व दिनांक ०८/०२/२०१७ रोजीच मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे, महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. तसेच मतदान दिनांक २१/०२/२०१७ रोजी होणार असुन दिनांक २३/०२/२०१७ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करावयाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

आणि ज्याअर्थी ठाणे पोलीस आयुक्तालयात यापूर्वी वेगवेगळया पक्षांमध्ये राजकीय स्पर्धेपोटी वादविवाद होवून वेगवेगळया निवडणुकीच्या संबंधात दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे दाखल झालेले आहेत. **ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने** स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये आपसात भांडणतंटे होवून हातघाईवर येण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा प्रसंगी एखादया गटाकडून/व्यक्तीकडुन हत्याराचा दुरुपयोग होवून गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता **ठाणे पोलीस आयुक्तालयातील निवडणुकीच्या कार्यक्षेत्रात** शस्त्र परवानाधारक यांनी शस्त्रांची ने–आण करण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे क्रमप्राप्त वाटते.

त्या अर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी **'परम बीर सिंह' पोलीस आयुक्त, ठाणे शहर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उप आयुक्त परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ– ५ वागळे इस्टेट तसेच परिमंडळ–४ उल्हासनगर हद्दीतील शस्त्र परवानाधारक यांना शस्त्र ताब्यात ठेवण्यास व बाळगण्यास मनाई करीत आहे. तथापी छाननी समितीने ज्यांना सुट दिलेली आहे, त्या शस्त्र परवानाधारकांना हा मनाई आदेश लागू होणार नाही.**

**यापुढे असेही आदेश देण्यात येत आहे की, ज्या शस्त्र परवानाधारकांना या आदेशान्वये छाननी समितीने सुट दिलेली आहे, त्या शस्त्र परवानाधारकांनी आपली शस्त्रे निवडणूकीच्या कोणत्याही कार्यक्रमादरम्यान उदा. प्रचार, सभा, रॅली प्रसंगी जवळ बाळगू नये.**

प्रत्येक शस्त्र परवानाधारकास आदेशापूर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने कलम १४४ (२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आला आहे.

सदरचा आदेश **ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उप आयुक्त परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ– ५ वागळे इस्टेट तसेच परिमंडळ–४ उल्हासनगर हद्दीतील निवडणूक असलेल्या प्रभाग क्षेत्रात दि:२४/०१/२०१७ रोजी ००.०१ वा. पासून ते दि.२३/०२/२०१७ रोजीचे २४.०० वा. पर्यत अंमलात राहील.**

उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या **शस्त्र परवानाधारकांवर भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार कायदेशिर कारवाई केली जाईल. सदरचा आदेश दिनांक २३/०१/२०१७ रोजी माझे सही व शिक्क्यांने दिला आहे.**

दिनांक :–२३/०१/२०१७

शिक्का

**( परम बीर सिंह )**
**पोलीस आयुक्त, ठाणे शहर**

## फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वयेचा मनाई आदेश

---

१) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र, यांचेकडील क्रमांक—रानिआ/मनपा—२०१७/प्र.क्र.२/का.५ दिनांक ११/०१/२०१७ अन्वये.
२) जा.क्र.विशा/मनपा/निवडणुक/मनाई आदेश/ ०५ /२०१७, दिनांक २३/०१/२०१७

---

**<u>आदेश:—</u>**

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ मधील अधिसूचनेनुसार राज्य निवडणूक आयोगाने, **ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक—२०१७** चा कार्यक्रम जाहीर केला आहे. आदर्श आचारसंहिता दिनांक ११/०१/२०१७ रोजी मध्यरात्री १२.०० पासून लागू झाली असून दिनांक २७/०१/२०१७ पासून ते दिनांक ०३/०२/२०१७ चे दरम्यान नामनिर्देशन पत्र दाखल करणे व दिनांक ०४/०२/२०१७ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होवुन दि.०७/०२/२०१७ रोजी उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख असून दिनांक ०८/०२/२०१७ रोजी निवडणूक चिन्ह नेमून अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व दिनांक ०८/०२/२०१७ रोजीच मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे, महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे. तसेच मतदान दिनांक २१/०२/२०१७ रोजी होणार असुन दिनांक २३/०२/२०१७ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करावयाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

अशावेळी **नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याच्या ठिकाणी** निवडणूक संबंधाने राजकीय पक्ष आपआपले शक्ती प्रदर्शन करण्यासाठी, नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस मोठया प्रमाणावर एकत्र येण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणांच्या प्रांगणात कॉर्नर मिटींग, सभा, पत्रकार परिषद, इत्यादीसारखे कार्यक्रम निवडणुक संबंधाने घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निवडणुक प्रक्रियेमध्ये अडथळा येवून सदर ठिकाणची शांतता भंग होण्याची दाट शक्यता आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी **मी 'परम बीर सिंह', पोलीस आयुक्त, ठाणे** मला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार अशा ठिकाणांच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजुकडील परिसरात कोणत्याही पक्षाचे/संघटनेचे पदाधिकारी/कार्यकर्ते आणि प्रतिनिधी यांना निवडणुक संबंधाने सभा/बैठक/पत्रकार परिषद आदी कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करीत आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार व त्याच्या सोबत दोन व्यक्ती यांनाच निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल. त्याचप्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल करण्यास येणाऱ्या उमेदवारास नमुद ठिकाणाच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजुकडील परिसरात फक्त तीन वाहने आणण्याची परवानगी देण्यात येत असून तीन पेक्षा अधिक वाहने **सदर कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात आणण्यास प्रतिबंध घालीत आहे.**

वरील आदेशाचे कोणीही व्यक्तीने उल्लंघन केल्यास अशा व्यक्तीविरूध्द **भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**सदर आदेश दिनांक २७/०१/२०१७ रोजी ००.०१ पासुन दिनांक ०८/०२/२०१७ रोजी २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.**

सदर आदेश शासकीय कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तसेच शासकीय/निमशासकीय, निवडणुक कामाशी संबधित शासकीय/निमशासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना लागू होणार नाही.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक २३/०१/२०१७ रोजी ठाणे येथे जारी करण्यात आला आहे.

दिनांक :— २३/०१/२०१७

शिक्का

पोलीस आयुक्त
सत्यमेव जयते
ठाणे

२३/१

( परम बीर सिंह )
**पोलीस आयुक्त, ठाणे शहर**